
Read India
An Imprint of Pratham Books

# रितूचे लांबलचक पत्र!

माला कुमार
हेनू



# रितूचे लांबलचक पत्र!

लेखिकाः माला कुमार

चित्रांकनः हेनू

अनुवादः डॉ. उत्कर्षा मनिष

आजोबा पत्र लिहित होते. रितू आरामखुर्चीला टेकून उभी होती. ''आजोबा, आत्याला तुम्ही सांगितलंय ना की सुट्टीत मणीला आपल्या घरी इकडे पाठव म्हणून?''



‘‘हो बाळा, मी लिहिले आहे. हे बघ मी पत्र वाचून दाखवतो. प्रिय पूजा, तुम्ही सगळे खुशाल आहात ना? मणीला आता सुटी लागली असेल. रितू त्याला भेटायला आतुर झाली आहे. तू त्याला टुमकूरला पाठव.’’



गरवारे बालभवन
पुणे

रितू उड्या मारू लागली. तिला इतका आनंद झाला की काही सुचेच ना! ती खोलीभर धावली आणि आजोबांना मिठी मारली.

“हे पत्र तू स्वत: पोस्टात टाकशील?” आजोबांनी विचारले.

रितूने डोळे मोठे करत विचारले, “मी टाकू?”





‘‘हो छकूली. बघ, मी याच्यावर पत्ता लिहिला आहे. हे पोस्ट ऑफीसात घेऊन जा आणि रमेशकाकांना दे. पिळदार मिशा असलेले काका माहीत आहेत ना तुला?’’

‘‘हो आजोबा. त्यांनीच तर मणीला गेल्या उन्हाळ्याच्या सुट्टीत सायकल चालवायला शिकवली. ते पूजाआत्याला पत्र नेऊन देणार का?’’ रितूने विचारले.

‘‘नाही रितू. पण हे पत्र तुझ्या आत्याला नक्की पोहचेल. काळजी करू नको.’’




रितूने आपली गुलाबी झोळी उचलली. त्यात पोस्ट कार्ड घातले आणि पेन्सिलही ठेवली. तिला आपण मोठे झालो असे वाटले. बगीरा कुत्रा मागे लागेल अशी थोडीशी भीतीही वाटली. पण ती पत्र टाकायला उत्सुक होती. चार इमारती सोडून असलेल्या पोस्ट ऑफिसात ती निघाली.





९२१

थोडे  चालल्यावर ती थांबली. तिने पत्र बाहेर काढले. तिला आजोबांचे अक्षर काही वाचता येईना. मग आजोबांनी काय वाचून दाखवले होते याचा तिने विचार केला. तिने जो शब्द टुमकूर असा वाचला त्याच्या पुढे 'नककी पाठव' असे लिहून, खूश होऊन पुढे निघाली.



दुसऱ्या इमारतीपर्यंत पोहचल्यावर ती पुन्हा थांबली. पुन्हा तिने पत्र बाहेर काढले.


'जर पूजाआत्याला आपण मणीच्या भेटीसाठी किती आतुर आहोत हे कळले नाही तर?'

म्हणून पुन्हा रितूने पेन्सिल काढली आणि लिहिले, "नककि पाठव."



९२११
पुणे महानगरपालिका
गरवारे बालभवन
पुणे






शेवटी त्या छोट्या पोस्ट ऑफिसात रितू पोहचली. पोस्ट ऑफिसच्या बाहेर एक लाल पोस्टाची पेटी होती.




तिने टाचा उंच करून पत्र
पेटीत टाकण्याचा प्रयत्न केला.


ती रमेशकाकांकडे गेली. त्यांनी तिच्याकडून ते पत्र हसत-हसत घेतले.

"हुशार आहेस हो. आता तू घरी परत जा. तुझे पत्र आत्याला नक्की पोहचेल."

पण रितू बाहेर गेली नाही. तिने रमेशकाकांना पत्रावर काहीतरी पेनाने लिहिताना पाहिले. नंतर त्यांनी ते पत्र पोस्टमनला दिले. तो पत्रावर ठप्पे मारत होता.




ठक, ठक, ठक पत्रावर ठप्पे बसत होते. रितूचे पत्र पाहिल्यावर तो थांबला. आणि हसला. आपल्या कानामागून पेन्सिल काढली आणि पत्रावर काहीतरी लिहिले.





पाच दिवस उलटले. पोस्टमनने आजोबांसाठी पत्र आणले. त्यांनी ते वाचले. ते हसत म्हणाले, ''रितू, आत्याने सांगितले आहे की मणी परवा येईल. मी तुला पत्र वाचून दाखवतो.''


प्रिय बाबा,

डाडाडा...डाडाडा...

डाडाडा...डाडाडा...

मी मणीला उद्या पाठवत आहे. शुक्रवारी तो टुमकूरला पोहचेल. त्याला भेटायला रितू बरीच आतुर आहे असे दिसते. तुमचे पत्र मजेशीर होते!



“आजोबा मी त्या
पत्रात ‘नककी
पाठव’ लिहिलं
होतं म्हणून!”
रितू उत्साहाने
म्हणाली.
“तुझ्या पत्रात
वीस वेळा नक्की
पाठव लिहिलं
होतं!”
आजोबा म्हणाले.





एका 'नक्की पाठव'चे इतके कसे झाले हे रितूला कळत नव्हते. तिने एक 'नककी पाठव' लिहिले होते म्हणून ती खूश होती. आणि नंतर आणखी एक 'नकिक पाठव' लिहिले होते!


नक्की पाठव
नकक्कि पाठव
नकक्की पाठव
नक्की पाठव
नकक्कि पाठव
नककि पाठव
नक्की पाठव
नकक्की पाठव
नककी पाठव



नमस्ते, मी श्रेया. मला कॅरम खेळायला आवडतो. मी डॉक्टर होण्यासाठी खूप अभ्यास करणार आहे. मला पुस्तके वाचायला आवडतात!
तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमची आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तके घेता येतील.

**माला कुमार** या पत्रकार आणि संपादक आहेत. त्या प्रथम बुक्ससाठी काम करत असून प्रत्येक लहान मुलाच्या हातात एक पुस्तक असले पाहिजे या मोहिमेत त्या सामील आहेत.

**हेनु** यांना लहान मुलांसाठी पुस्तके करायला आवडतात. ''मी असे मानते की सुंदर रंगीत चित्रांची पुस्तकं मुलांची दृश्यकलेची जाण वाढवतात जी त्यांना पुढे उपयोगी पडते.'' कंप्युटरसह सर्व साधनांनी त्या काम करतात. चित्रकार म्हणून घडत जाणं हे त्यांच्या बाबतीत नैसर्गिकरित्या घडलं.



रितू आपल्या आतेभावाला
भेटायला आतुर आहे.
म्हणून ती त्याला
एक पत्र लिहिते.



आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉग ऑन करा

आमची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी, कानडी, गुजराथी, बंगाली, तामिळ, तेलुगु, पंजाबी, उर्दू आणि उडिया या भाषांमध्ये मिळतात.

**PRATHAM BOOKS**

**प्रथम बुक्स** ही ना-नफा तत्वावर चालणारी संस्था असून, अनेक भारतीय भाषांमध्ये, लहान मुलांसाठी उत्तम दर्जाची पुस्तके परवडतील अशा किंमतीत प्रसिद्ध करते.

ISBN 978-81-8479-163-1
9 788184 791631

Age Group: 3-6 years
Ritooche Laambalachak Patra! (Marathi)
MRP: Rs. 25.00